**महाराष्ट्र जनशक्ती** | **ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २९५ वे | दिनांक : २२/१०/२०२६ | वार : गुरूवार

## पुढील ४-५ महिन्यांत देशात मोठी उलथापालथ होणार : राज ठाकरे



**मुंबई** : देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पुढील ४ ते ५ महिन्यांत देशात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. देशात काहीतरी मोठी गडबड होईल, असा अंदाज व्यक्त करतानाच एका टप्प्यावर देशाला पंतप्रधानच नसण्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते, असेही ते म्हणाले. सरकारकडून चुका सुरूच राहिल्या, तर देशभरातील लोक रस्त्यावर उतरले तरी आश्चर्य वाटणार नाही, असे भाकीत त्यांनी केले.

मुंबईतील प्रेस क्लबमध्ये छायाचित्रकार दुधलकर यांच्या छायाचित्र प्रदर्शनाच्या उद्‌घाटनासाठी राज ठाकरे आले होते. यावेळी पत्रकारांशी झालेल्या संवादात त्यांनी देशातील राजकीय परिस्थिती, लोकशाही, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, ईव्हीएम, तरुणांचा असंतोष आणि दुष्काळाच्या प्रश्नावर आपली भूमिका मांडली. यावेळी त्यांनी बॅलेट पेपरवर मतदान घेण्याच्या मागणीचा पुनरुच्चार केला. तसेच देशात लोकशाही कुठे आहे, असा सवाल उपस्थित करत सरकारच्या कारभारावरही टीका केली.

दसरा मेळाव्यांमध्ये झालेल्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांबाबत विचारले असता, राज ठाकरे यांनी आपण मेळावे पाहिले नसल्याचे सांगितले. राजकीय टीका-टिप्पणी होणारच असून, त्याला चिखलफेक म्हणायचे की आणखी काही, हा वेगळा मुद्दा आहे. मात्र, सध्याच्या परिस्थितीवर बोलले गेलेच पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी दसरा मेळाव्यात एप्रिल महिन्यापर्यंत केंद्र सरकारमध्ये बदल होईल आणि नरेंद्र मोदी यांना पायउतार व्हावे लागेल, असा दावा केल्याबाबत राज ठाकरे यांना विचारण्यात आले. त्यावर उत्तर देताना, पुढील दोन ते चार किंवा पाच महिन्यांत देशात काहीतरी मोठी गडबड होईल, एवढे निश्चित असल्याचे ते म्हणाले.

येत्या काळात अनेक गोष्टी बाहेर येतील आणि सरकारकडून चुका सुरूच राहिल्या, तर ही परिस्थिती थांबणार नाही, असेही त्यांनी सांगितले. देशभरात आंदोलनांची परिस्थिती निर्माण झाली आणि अख्खा देश रस्त्यावर उतरला, तरी आपल्याला आश्चर्य वाटणार नाही, असे राज ठाकरे म्हणाले.
दरम्यान, देशात काही काळ असा येऊ शकतो, जेव्हा देशाला पंतप्रधानच नसेल, असे विधानही त्यांनी केले. मात्र, हा त्यांचा राजकीय अंदाज असून, याबाबत कोणतीही निश्चित घटना किंवा कालमर्यादा सिद्ध झालेली नाही.

राज ठाकरे यांनी २०१८ पासून निवडणुकांमध्ये बॅलेट पेपरचा वापर करण्याची मागणी करत असल्याचे सांगितले. या मागणीसाठी आपण अनेक राजकीय नेत्यांच्या भेटी घेतल्या होत्या. तसेच तत्कालीन निवडणूक आयुक्तांशी चर्चा करण्यासाठी दिल्लीला गेलो होतो, असेही त्यांनी नमूद केले. त्या वेळी आपण मांडत असलेली भूमिका अनेकांना समजली नव्हती; मात्र आता निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा मुद्दा लोकांना समजू लागला आहे, असे ते म्हणाले.

मतदान करताना आपण नेमके कोणाला मत दिले, याचे समाधान मतदाराला मिळाले पाहिजे. बॅलेट पेपरवर मतदान केल्यास आपण निवडलेल्या उमेदवाराच्या नावासमोरील मतपत्रिका मतपेटीत टाकल्याची खात्री मतदाराला मिळते. त्यामुळे मतदान प्रक्रियेत पारदर्शकता आणि विश्वास असणे आवश्यक आहे, असे राज ठाकरे यांनी सांगितले.

ईव्हीएमच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित करताना त्यांनी मतदानासाठी मशीनचा वापर कशासाठी केला जातो, असा सवाल केला. मतदाराने एका ठिकाणी बटण दाबल्यानंतर मतदानाची नोंद वेगवेगळ्या यंत्रणांमधून कशी होते, याबाबत त्यांनी आक्षेप नोंदवला. निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा मतदारांना समजणारा आणि विश्वासार्ह असला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

ईव्हीएमच्या समर्थनार्थ मतमोजणी जलद होते, असा युक्तिवाद केला जातो. मात्र, निवडणुकीचे निकाल जाहीर होण्यास प्रत्यक्षात उशीर होत असेल, तर केवळ मतमोजणीच्या वेगाचा मुद्दा पुढे करण्याला काय अर्थ आहे, असा सवाल राज ठाकरे यांनी केला. बॅलेट पेपरवर मतदान आणि मतमोजणीसाठी चार दिवस लागले, तरी त्यात गैर काय, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीचे उदाहरण देताना, त्या वेळी १२ फेब्रुवारीला मतदान झाले आणि १२ मार्चला निकाल जाहीर झाला होता, असे त्यांनी सांगितले. त्यावेळी निकालासाठी एक महिना लागला, तरी त्यामुळे काही फरक पडला नाही, असे त्यांचे म्हणणे होते.
लोकसभा आणि विधानसभा निवडणुकाही वेगवेगळ्या टप्प्यांत घेतल्या जातात. त्यामुळे ईव्हीएममुळे मतमोजणी जलद होते, या कारणावरूनच मशीनचा आग्रह धरण्याची गरज नाही, असे ते म्हणाले. जगातील इतर देशांतील मतदान पद्धतींचा संदर्भ देत राज ठाकरे यांनी भारतातही बॅलेट पेपरवर मतदान व्हावे, अशी मागणी केली. फ्रान्समध्ये मशीनच्या वापराबाबत नागरिकाने न्यायालयात तक्रार केल्यानंतर मतदान पद्धतीत बदल झाल्याचे उदाहरणही त्यांनी दिले. या आंतरराष्ट्रीय उदाहरणांबाबत त्यांनी मांडलेले तपशील स्वतंत्रपणे पडताळलेले नाहीत.

## एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांना पास होण्यासाठी आता ४ नाही तर ५ संधी



**नाशिक** : महाराष्ट्रातील वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष उत्तीर्ण होण्यासाठी अतिरिक्त परीक्षेची एक विशेष दया संधी (Mercy Attempt) उपलब्ध करून देण्यात आली आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे (MUHS) कुलगुरू डॉ. व्यंकट गिते यांच्या विशेष पुढाकारामुळे आणि राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडे (NMC) केलेल्या पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

आरोग्याशी संबंधित गंभीर समस्या, वैयक्तिक अडचणी किंवा इतर अपवादात्मक परिस्थितीमुळे अनेक विद्यार्थ्यांना नियमित संधींमध्ये परीक्षा उत्तीर्ण होता आले नव्हते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळावे, त्यांच्यावरील मानसिक ताण हलका व्हावा आणि आर्थिक भार कमी व्हावा, या उद्देशाने विद्यापीठाने राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडे अतिरिक्त संधी देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी सांगितले की, विद्यापीठ प्रशासन नेहमीच विद्यार्थ्यांच्या हितासाठी सकारात्मक निर्णय घेण्यास कटिबद्ध असून, कुलगुरूंच्या प्रयत्नांमुळे हा विद्यार्थीहितैषी निर्णय शक्य झाला आहे.

•**५ प्रयत्नांची संधी:** राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या नियमानुसार प्रथम वर्षासाठी आधी ४ संधी दिल्या जात होत्या. आता ४ नियमित आणि १ विशेष 'दया संधी' अशा एकूण ५ संधी मिळतील.

•**२०१९-२० पासूनच्या सर्व बॅचेससाठी लागू:** शैक्षणिक वर्ष २०१९-२० व २०२०-२१ या बॅचेसना कोविडमुळे ५ वा प्रयत्न मिळाला होता. मात्र, नवीन निर्णयानुसार २०१९-२० च्या बॅचपासून पुढील सर्व बॅचेसमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ही विशेष दया संधी लागू असेल.

•**प्रवेश वैध असणे आवश्यक:** ज्यांचे प्रथम वर्षाचे ४ प्रयत्न संपले आहेत, त्यांनाही या संधीचा लाभ घेता येईल. मात्र, विद्यार्थ्याचा महाविद्यालयातील किंवा विद्यापीठातील प्रवेश वैध असावा (रद्द झालेला नसावा).

•**कालावधीची अट:** विद्यार्थ्यांना संपूर्ण एम.बी.बी.एस. (MBBS) अभ्यासक्रम हा इंटर्नशिपसह १० वर्षांच्या आत पूर्ण करणे बंधनकारक राहील.

•**एकवेळची विशेष सवलत:** ही केवळ एकवेळची (One-time measure) विशेष उपाययोजना असून याचा पायंडा (Precedent) म्हणून वापर करता येणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

या निर्णयाबाबत नॅशनल मेडिकल कौन्सिलच्या अधिकृत संकेतस्थळावर परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले असून, सर्व संबंधित विद्यापीठे व वैद्यकीय महाविद्यालयांना त्यानुसार तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ ऑक्टोबर २०२६


## आ. बसवराज पाटील यांच्या हस्ते विठ्ठलसाई कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ




**मुरूम : (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** ता. उमरगा येथील श्री. विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्याचा हंगाम २०२६-२७ साठीचा बॉयलर अग्निप्रदीपन व गळीत हंगाम शुभारंभ सोहळा कारखाना कार्यस्थळावर आज रोजी माजी मंत्री, कारखान्याचे चेअरमन आ. बसवराज पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.श्री. विठ्ठलसाई कारखान्याचे कामकाज मा.आ.श्री. बसवराज पाटील यांच्या नियोजनबध्द मार्गदर्शनाखाली सुरू असून चालू हंगामासाठी करावयाची संपूर्ण कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. यावर्षी कारखाना कार्यक्षेत्रात लागण व खोडवा मिळून जवळपास १८००० हेक्टर ऊसाची नोंद झालेली आहे. यासाठी कारखाना व्यवस्थापनाने जास्तीतजास्त ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चीत केले आहे. यासाठी पुरेशी ऊसतोड व वाहतुक यंत्रणा भरती करून त्याचे नियोजन करण्यात आले आहे. कारखान्याचा हंगामात कार्यक्षेत्रातील गाळपास आलेल्या ऊसास योग्य भाव देण्यात येणार असून कोणाचाही ऊस गाळपाविना शिल्लक राहणार नाही अशी ग्वाही कारखान्याचे चेअरमन मा.आ.श्री. बसवराज पाटील यांनी यावेळेस दिली. कारखान्याचे व्हा.चेअरमन मा.श्री. सादीकसाहेब काझी, याप्रसंगी मा.श्री. बापुराव पाटील, अध्यक्ष नगर परिषद, मुरूम, उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन मा.श्री. शरणजी पाटील तसेच कारखान्याचे संचालक सर्वश्री अँड. सुभाषराव राजोळे, केशवराव पवार, शरणप्पा पत्रिके, दिलीप पाटील, विठ्ठलराव बदोले, राजीव हेबळे, संगमेश्वर घाळे, माणिकराव राठोड, रामकृष्णपंत खरोसेकर, शब्बीर जमादार, अँड. संजय बिराजदार, दत्तु भालेराव, शिवलिंगप्पा माळी, शिवमुर्ती भांडेकर, अँड. विरसंगप्पा आळंगे, संतराम बिराजदार तसेच प्रकाश आष्टे, बलभिमराव पाटील, नानासाहेब पाटील, अँड. बाळासाहेब पाटील, ह.भ.प.शरद बिराजदार महाराज, ह.भ.प.अडागळे महाराज बोरीकर, रशिद शेख, राजु वाघमारे, रफिक तांबोळी, योगेश राठोड, प्रल्हाद काळे, रविंद्र चव्हाण, मल्लिनाथ दंडगे, अँड. विश्वनाथ बिराजदार, गोविंद पाटील, देवेंद्र कंटेकुरे, पप्पु सगर, अँड. स्वप्नील कारभारी, नागनाथ पाटील व कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.एस.आर. गवसाणे, फॅक्टरी मॅनेजर राजेंद्र काळे व सर्व अधिकारी, कर्मचारी व कामगार पत्रकार, हितचिंतक आदी मान्यवर उपस्थित होते.

## बालचित्रकला स्पर्धेत राजनंदिनी बनकर व साधना शिरसे जिल्ह्यात प्रथम





**कन्नड प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्यामार्फत आयोजित बालचित्रकला स्पर्धेत जिल्हा परिषद प्रशाला, बहिरगाव ता.कन्नड येथील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्राथमिक आणि माध्यमिक अशा दोन्ही गटांत जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावत प्रशालेने दुहेरी यश मिळविले आहे.या स्पर्धेत इयत्ता पाचवी ते सातवीच्या प्राथमिक गटातून राजनंदिनी जगदीश बनकर हिने, तर इयत्ता आठवी ते दहावीच्या माध्यमिक गटातून साधना शंकर शिरसे हिने जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळविला. दोन्ही विद्यार्थिनींच्या चित्रांचा राज्यस्तरीय निवड यादीत समावेश झाला असून, त्यांच्या कलागुणांना राज्यस्तरावरही संधी मिळाली आहे.जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल दोन्ही विद्यार्थिनींना प्रत्येकी दोन हजार रुपयांचे पारितोषिक आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेत मिळविलेल्या या यशामुळे बहिरगाव प्रशालेच्या शैक्षणिक व कलात्मक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.दोन्ही विद्यार्थिनींना प्रशालेचे कलाशिक्षक सलीम आतार यांचे मार्गदर्शन लाभले. चित्रकलेतील सातत्यपूर्ण सराव, कल्पकता आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांमुळे विद्यार्थिनींना हे यश मिळविता आले.या यशाबद्दल प्रशालेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब घोलप, केंद्रप्रमुख विठ्ठल शेळके, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कृष्णा पवार, बहिरगावचे सरपंच डॉ. केशव शिरसे उपसरपंच रत्नाबाई पवार ,आणि सोसायटीचे चेअरमन कौतिकराव पवार यांनी दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.तसेच शिक्षक दिलीप महाजन, कुलभूषण व्यवहारे, नूतन पवार, श्याम खोसरे, सलीम आतार, किरण पाटील, राधेश्याम शर्मा, स्वप्निल गांगुर्डे, गणेश बल्लाळ, रवींद्र ठाकरे, किसनाबाई गोरे आणि सविता कुंटे यांनी विद्यार्थिनींचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## घ्यावे बापाला जाणून

बाप असतो आपला देव,  
ज्ञान देतो सदा भरभरून.  
सारे जग दाखवितो,  
तुला खांद्यावर उचलून. 1

घ्यावे बापाला जाणून,  
असतांना रे जिवंत.  
घ्यावे ऐकून बापाचे,  
नाही वाटणार खंत. 2

ठेवा जाणीव बापाची,  
बाप केलेल्या कामाची.  
मिळतच नाही त्याला,  
कधी मोबदला घामाची. 3

असतांना कळणार नाही,  
नसतांना भासते हमी.  
नित्य पदोपदी जाणवते,  
बाप नसल्याची कमी. 4

बाप गेल्यानंतरच,  
होते बापाची जाणीव.  
बाप नसतांना तुला,  
सदा भासते उणीव. 5

म्हणूनच म्हणतो मित्रा,  
घ्यावे समजून बापाला.  
नाहीतर होई त्रास,  
सदोदित तुझ्या मनाला. 6

**नागेश बोंतेवाड,**  
**छत्रपती संभाजीनगर**





प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ ऑक्टोबर २०२६

## टिटवी कालिंका माता गड पठारावर बहरली सोनकाडीची रानफुले



**कन्नड (अरुण थोरात) :** सह्याद्रीची उपरांग असलेल्या अजिंठा डोंगर रांगेतील धावडा गावाच्या उत्तरेस असलेल्या टिटवी कालिंका माता गड येथे निसर्ग संपन्न वातावरण असल्याने अनेक हौशी पर्यटक या राखीव वनक्षेत्रात फिरायला येताहेत. नवरात्रात इथे हजारो भाविक ही दरवर्षी येतात. यातील सर्वच पर्यटक हे भाविक नसतात. वनक्षेत्रात व त्याला अगदी खेटून लगतच्या मालकी क्षेत्रातील पठारावर ही बोटी - बाटलीच्या 'मैफली' रंगतात. याच वनक्षेत्र व लगतच्या पठारावर "सोनकाडी" नामक दुर्मिळ रानफुले आता बहरली आहेत. या ठिकाणी माणसे येण्याने जाण्याने ही रानफुले पायदळी तुडविली जात आहेत व तीची फलधारणा न झाल्याने १५ वर्षापूर्वी लाखोच्या संख्येत असणारी ही सोनकाडी आता थोडीच उरली आहेत. सिल्लोड येथील वन्यजीव व वनस्पती संवर्धक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे डॉ. संतोष पाटील आपल्या सहकारी मित्रांसोबत देवीच्या दर्शनास गेले असता त्यांना राखीव जंगलात प्रचंड प्रमाणात प्लास्टिक कचरा, दारूच्या काचेच्या फुटलेल्या बाटल्या आढळल्या. ही बाब गांभीर्याने घेत त्यांनी भाऊसाहेब निकोद, भिकण सोन्ने, देवस्थानचे पुजारी यांच्या मदतीने ४ गोणी प्लास्टिक तेथून काढले व सिल्लोड येथे आणून नगरपरिषदच्या कचरा गाडीत टाकले. देवस्थान, वनविभाग व संघाचे स्वयंसेवक तेथे लवकरच व्यापक स्वच्छता अभियान राबविणार आहे. देवस्थान समिती नेहमी हौशी पर्यटकांना समज देते मात्र निसर्ग विघातक मानवी वृत्ती यास जुमानत नाही. फुटलेल्या दारूच्या बाटल्या, प्लास्टिक , थर्माकोल पत्रावळी वनात भटकणाऱ्या वन्यजीवांना बाधक ठरत आहेत. "सोन्या सारखी सोनकाडी" अजिंठा डोंगर रांगेत टिटवीगड, वडाळा, कळसाई, गिल्डा पठारावर ही दुर्मिळ पिवळी धमक रानफुले ऑक्टोबर महिन्यात या पठारावर, डोंगर माथ्यावर फुलतात. तेव्हा तो भाग पिवळा गर्द दिसतो व डोंगर माथ्याने सुवर्ण मुकुट घातला आहे असे भासते. वनविभागाने येथील निसर्ग विघातक मानवी हस्तक्षेप थांबवने गरजेच आहे.चौकट_जैवविविधतेचा अनमोल ठेवा - ही सूर्यफूल कुळातील वर्षायु वनस्पती आहे. हिचे शास्त्रीय नाव 'वियोका इंडिका' असे असून मधमाशा, फुलपाखरे यांना उपयोगी आहे. पिया ब्ल्यू (नील वाटाणा) या फुलपाखराचा या ही फुले अधिक मकरंद हेतू अधिक आवडतात.

७ ते ८ इंच वाढणाऱ्या वनस्पती मध्ये "विकोलिडा ए , बी, सी" नामक इस्ट्रोजन विरोधी तत्व असून ते संतती प्रतिबंधक गुण धर्माचे आहे म्हणून प्राचीन आयुर्वादात यास "वंध्य वारी" म्हणतात.- डॉ संतोष पाटील, वन्यजीव संवर्धक, सिल्लोड

## शिक्षण आणि प्रचंड मेहनतीच्या बळावरच जीवनात यश - डॉ. धनराज राठोड यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




**कन्नड, प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांनी नियमितपणे वर्गात उपस्थित राहून प्रामाणिकपणे मेहनत घ्यावी. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही प्रचंड बुद्धिमत्ता आणि क्षमता आहे. केवळ योग्य दिशेने प्रयत्न, सातत्य आणि मेहनत घेतल्यास विद्यार्थी जीवनात निश्चितच यशस्वी होऊ शकतात, असे प्रतिपादन Cifa Cilinas Biotech Pvt. Ltd., छत्रपती संभाजीनगर येथील इंडस्ट्री चे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. धनराज राठोड यांनी केले.शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथील रसायनशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित बी . एससी च्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले होते, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. शंतनू चव्हाण आणि डॉ. प्रदीप बुरकुल उपस्थित होते.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. राठोड म्हणाले की, विद्यार्थ्यांनी नियमितपणे महाविद्यालयात उपस्थित राहून अध्यापनाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकडे प्रचंड मेहनत करण्याची ताकद असते , ती त्यांनी अभ्यासासाठी वापरली पाहिजे. शिक्षक विद्यार्थ्यांना जे मार्गदर्शन करतात, ते त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठीच असते. त्यामुळे शिक्षकांच्या सूचनांचे पालन करून अभ्यासात सातत्य ठेवणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी न्यूनगंड न बाळगता आत्मविश्वासाने शिक्षण घेतले पाहिजे. प्रामाणिकपणे मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यशाच्या अनेक संधी उपलब्ध असतात."मी स्वतः शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथेच घडलो," असे सांगत त्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील अनुभवांना उजाळा दिला. याच महाविद्यालयातून मिळालेल्या शिक्षणाने आणि संस्कारांनी आपल्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षण हे व्यक्तिमत्त्व विकासाचे, प्रगतीचे आणि समाजात सन्मानाने जगण्याचे प्रभावी साधन आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करून ज्ञान, कौशल्ये आणि चांगले संस्कार आत्मसात करावेत, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी माजी विद्यार्थ्यांच्या यशस्वी वाटचालीचा वर्तमान विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन केले. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या अनुभवांचा उपयोग नव्या पिढीच्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रगतीसाठी करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, नियमित अभ्यास, मेहनत, आत्मविश्वास आणि ध्येयपूर्तीसाठी आवश्यक असलेल्या गुणांची प्रेरणा मिळाली. माजी विद्यार्थ्याच्या यशस्वी वाटचालीतून वर्तमान विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याच्या उद्देशाने आयोजित हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ अतिश मेहेत्रे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा डॉ बी के मगरे सर यांनी मांडले.कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती उल्लेखनीय होती.

## दसऱ्याच्या मुहूर्तावर संत सखुबाई बचत गटाचा पापड लघुउद्योग सुरू




**कलदेव निंबाळा : (प्रा.नागसेन कांबळे)** दसरा-विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर उमरगा तालुक्यातील कलदेव निंबाळा येथील संत सखुबाई बचत गटातील महिलांनी पापड लघुउद्योग सुरू करून आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण महिलांसाठी रोजगारनिर्मितीची नवी संधी उपलब्ध झाली आहे.संत सखुबाई बचत गटाच्या श्रीमती सुनीता पाटील, सौ. शामल तळेकर, सौ. कविता रसाळ आणि सौ. उर्मिला दळवे यांनी एकत्रित पुढाकार घेत या व्यवसायाची सुरुवात केली. ग्रामपंचायत गटनेत्या तथा ग्राम विकास समितीच्या सचिव सौ. सुनीता पावशेरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दसऱ्याच्या दिवशी या लघुउद्योगाची सुरुवात करण्यात आली.या उद्योगासाठी १लाख ७२ हजारा पैकी वॉटरशेड संस्थेने 50 टक्के आर्थिक सहकार्य केले असून उर्वरित 50 टक्के लोकवाटा बचत गटातील महिलांनी उचलला आहे. संस्थेच्या सहकार्याला महिलांच्या पुढाकाराची जोड मिळाल्याने स्वतःचा व्यवसाय उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.बचतीचा उपयोग व्यवसायासाठी करत महिलांनी उद्योजकतेच्या क्षेत्रात पाऊल टाकले आहे. या उद्योगातून रोजगार व उत्पन्नाचे साधन निर्माण होऊन महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासह कुटुंबाच्या आर्थिक स्थैर्यालाही हातभार लागणार आहे.कलदेव निंबाळा येथे महिलांकडून द्रोण-पात्र निर्मिती, मिरची कांडप व विक्री, शिलाई मशीन, पीठ गिरणी आणि शेळीपालन यांसारखे विविध लघुउद्योगही केले जात आहेत. महिलांची एकजूट, मेहनत आणि वॉटरशेड संस्था व ग्राम विकास समितीचा समन्वय यांमुळे गावात महिला उद्योजकतेला चालना मिळत आहे.या वेळी सौ. मंगल पावशेरे, सौ. रेखा पाटील, सौ. सुहासिनी आलमले यांच्यासह बचत गटातील अन्य महिला उपस्थित होत्या. या उपक्रमाबद्दल बचत गटातील महिलांचे अभिनंदन करण्यात आले, तर सहकार्याबद्दल वॉटरशेड संस्थेचे आभार मानण्यात आले.यावेळी "वॉटरशेड संस्था आणि ग्राम विकास समिती यांच्या सहकार्य व समन्वयातून गावातील महिला बचत गट विविध लघुउद्योग आणि व्यवसाय यशस्वीपणे राबवत आहेत. महिलांनी बचतीचा योग्य विनियोग करून दुष्काळात स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारणे ही गावाच्या विकासाच्या दृष्टीने सकारात्मक बाब आहे."असे ग्रामविकास समितीच्या सचिव सौ. सुनीता देविदास पावशेरे यांनी सांगितले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ ऑक्टोबर २०२६

## मराठवाडा पदवीधर मतदारसंघात डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांच्या उमेदवारीला कास्ट्राइब कर्मचारी कल्याण महासंघाचा भक्कम पाठिंबा



**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे उमेदवार डॉ. प्रतापसिंह वेद प्रकाश पाटील यांच्या उमेदवारीला कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाने जाहीर पाठिंबा व्यक्त केला आहे. आमदार रोहितदादा पवार यांच्या उपस्थितीत हा पाठिंबा जाहीर करण्यात आला. पदवीधरांच्या आकांक्षांना न्याय मिळावा, सुशिक्षित तरुणांच्या स्वप्नांना नवी दिशा लाभावी आणि कर्मचारीवर्गाच्या प्रश्नांना सक्षम व्यासपीठ मिळावे, या व्यापक अपेक्षांच्या पूर्ततेसाठी महासंघाने डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांच्या विजयासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.ही निवडणूक केवळ उमेदवार निवडण्याची प्रक्रिया नसून, पदवीधरांचे प्रश्न, सुशिक्षित बेरोजगारांचे भविष्य आणि कर्मचारीवर्गाच्या न्याय्य हक्कांच्या अपेक्षांना अभिव्यक्त करणारा लोकशाहीचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या भावनेतून महासंघाने घेतलेली भूमिका ही एकजुटीची, विश्वासाची आणि परिवर्तनाच्या आशेची अभिव्यक्ती आहे.या प्रसंगी राज्य अध्यक्ष एन.एम .पवळे साहेब यांच्याशी विचार विनिमय करून पाठिंबा जाहीर केला.देवानंद वानखेडे, (कास्ट्राईब महाराष्ट्राचे महासचिव) डॉ. अनिल पांडे, (अतिरिक्त सचिव )प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर माधवराव, डॉ. बाळासाहेब लिहिणार, डॉ. अरुण शिरसाट, डॉ. अशोक बंडगर, अनिल वानखेडे सर, पठाण एन. जे. सर, सुबोध साळवे सर, डॉ. राम भोसले, प्रा. मोढेकर आर. आर., डॉ. राहुल तायडे, प्रा. गुणरत्न सोनवणे, राहुल इंगळे सर, अवचार सर, प्रा. तांबेकर सर, बनकर साहेब आणि सुधीर शेपवरे सर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## सारंच तर पेटलं आहे

सारंच तर पेटलं आहे आग कुठं दिसत नाही
फाटलेल्या आभाळाला सुईदोरा गवसत नाही.

करपल्या शिवारात भेगाळले रान सारे
डोईवर दुष्काळाचे घोंगावती भग्न वारे.

कृष्णाविना पराजय अर्जुनाचा ठरलेला
कलियुगी कौरवांचा जोर जरा वाढलेला.

वशिल्याच्या कुत्र्यांनी रस्ता सारा अडवला
धर्मराज युधिष्ठिर जुगारात सडवला.

युगे झाली कितीतरी जाळूनीया रावणास
रावणचं सज्ज पुन्हा, रावणाच्या दहनास.



**ज्ञानेश्वर गायके**
कन्नड




## मल्हारगडावर गडपूजन दसरा महोत्सव उत्साहात साजरा



**कन्नड (अरुण थोरात) :** सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान चाळीसगाव यांच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही चाळीसगाव व कन्नड जवळील औट्रमघाट परिसरातील ऐतिहासिक मल्हारगडावर गडपूजन दसरा महोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी भंडाऱ्याची उधळण, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीची मिरवणूक आणि खंडोबाच्या जयघोषाने संपूर्ण गड परिसर दुमदुमून गेला. दसऱ्याच्या मंगलमय पर्वावर सह्याद्री प्रतिष्ठानच्या दुर्गसेवक आणि दुर्गसेविकांनी मल्हारगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीची मिरवणूक काढली. गडाला तोरण बांधून विधिवत गडपूजन करण्यात आले. त्यानंतर खंडोबाची आरती आणि तळी भरण्याचा धार्मिक विधी पार पडला. भंडाऱ्याची उधळण करीत उपस्थित शिवप्रेमींनी मोठ्या उत्साहात दसरा महोत्सव साजरा केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचे साक्षीदार असलेल्या गडकोटांचे संवर्धन आणि ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यासाठी सह्याद्री प्रतिष्ठानच्या माध्यमातून महाराष्ट्रभर सातत्याने कार्य केले जात आहे. याच दुर्गसंवर्धनाच्या परंपरेचा भाग म्हणून यंदा महाराष्ट्रातील तब्बल ५१ गडकोटांवर दसरा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.चाळीसगाव तालुक्यातील मल्हारगडावर साजऱ्या होणाऱ्या या महोत्सवाचे यंदा दहावे वर्ष होते. गेल्या दहा वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा म्हणजे गडकोटांविषयीची निष्ठा, छत्रपती शिवरायांच्या इतिहासाप्रती असलेली आस्था आणि दुर्गसंवर्धनाच्या कार्याचा जागर आहे.

या महोत्सवात सह्याद्री प्रतिष्ठानचे दुर्गसेवक, दुर्गसेविका आणि शिवप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ऐतिहासिक गडकोटांचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे, त्यांच्याविषयी अभिमान निर्माण करणे आणि दुर्गसंवर्धनाच्या कार्याला बळ देणे, हा या महोत्सवामागील उद्देश असल्याचे दिलीपआबा घोरपडे यांनी सांगीतले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ ऑक्टोबर २०२६

# बाल जीवनाचे गाणे गाणारा काव्यसंग्रह : ‘गाऊ मजेत गाणे’




**बा**लपण हा मानवी जीवनातील सर्वांत निरागस, आनंददायी आणि कल्पनारम्य काळ असतो. या वयातील मुलांचे मन जिज्ञासू असते. सभोवतालच्या जगाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी कुतूहलपूर्ण असते. निसर्गातील रंग, फुलांचा सुगंध, पक्ष्यांचा किलबिलाट, पावसाच्या सरी, खेळातील आनंद आणि नात्यांमधील प्रेम या साऱ्या गोष्टी बालमनाला सतत आकर्षित करतात. या समृद्ध भावविश्वाला शब्दरूप देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य बालकविता करीत असते. बालकविता हा साहित्यप्रकार केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नाही. बालकांच्या भावविश्वाची अभिव्यक्ती, भाषिक विकास, कल्पनाशक्तीची वाढ आणि जीवनमूल्यांची रुजवण यांसाठी बालकवितेला विशेष महत्त्व आहे. लयबद्ध शब्दरचना, नादमयता, गेयता, यमक आणि सहजसुंदर भाषा ही बालकवितेची प्रमुख वैशिष्ट्ये होत. बालकवितेच्या माध्यमातून मुलांना आनंद मिळतो, त्यांच्या मनात नवनवीन प्रश्न निर्माण होतात आणि त्यांची विचार करण्याची क्षमता विकसित होते. त्यामुळे बालकविता ही बालमनाच्या जडणघडणीतील एक महत्त्वपूर्ण साहित्यप्रकार आहे. कवी बालाजी भागानगरे यांचा ‘बाला गं बाला’ या बालकवितासंग्रहानंतरचा ‘गाऊ मजेत गाणे’ हा दुसरा बालकवितासंग्रह पुणे येथील मिहाना पब्लिकेशनने प्रकाशित केला आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त बालसाहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांनी या संग्रहाला अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिली आहे, तर साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त बालसाहित्यिक श्री. एकनाथ आव्हाड यांनी पाठराखण केली आहे. अत्यंत सुंदर मुखपृष्ठ आणि पुस्तकाच्या आतील बोलकी चित्र काढून पुस्तक आकर्षक करणारे ज्येष्ठ चित्रकार श्री संतोष घोंगडे यांनी कवितासंग्रहाच्या सौंदर्यात भर घातली आहे. ‘गाऊ मजेत गाणे’ या संग्रहात एकूण ४२ कवितांचा समावेश आहे. विषयवैविध्य हे या संग्रहाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ईश्वराची आराधना, सण-उत्सव, जंगली व पाळीव प्राणी, देशप्रेम, कृषीनिष्ठा, विश्वपर्यटन, ऋतुमान, संतांची शिकवण, संगीतकला, बालपणातील खाद्यसंस्कृती, कौटुंबिक नातेसंबंध आणि आनंददायी जीवनदृष्टी अशा विविध विषयांवर कवीने लेखन केले आहे. या विषयांमधून बालमनातील कुतूहल, आनंद, संवेदनशीलता आणि मूल्यविचार व्यक्त होतात.या संग्रहातील पहिलीच ‘प्रार्थना’ ही कविता ईश्वराप्रती भक्तिभाव व्यक्त करताना मानवतेचा संदेश देते. कवी विश्वेश्वराला प्रार्थना करताना म्हणतात,‘सर्वां हृदयी प्रेम भरी तू नको भेदभावनासुख शांती रे नांदो जगती हीच एक कामनाईर्षा मत्सर जावो सरुनी बंधुभाव दे खराहात जोडुनी तुझी प्रार्थना करितो विश्वेश्वरा’. (पृ. ११) अशा शब्दांत प्रेम, शांतता, बंधुभाव आणि समतेची भावना व्यक्त होते. बालमनावर लहानपणापासूनच मानवी मूल्यांचे संस्कार व्हावेत, ही या कवितेमागील भूमिका आहे. प्रार्थनेच्या माध्यमातून कवी केवळ ईश्वराचे स्मरण करीत नाहीत, तर समाजात परस्परांविषयी प्रेम आणि सद्भावना नांदावी, अशी अपेक्षाही व्यक्त करतात. भारतीय संस्कृतीत सण-उत्सवांना विशेष महत्त्व आहे. राखी, ओवाळणी, दिवाळी, होळी आणि खंडोबाची जत्रा अशा विविध विषयांवरील कवितांमधून कवीने सण-उत्सवांचे आनंददायी वातावरण उभे केले आहे. या कविता बालकांना भारतीय संस्कृतीची ओळख करून देतात. ‘दिवाळी’ या कवितेत कवीने दिवाळी या सणाचा आनंद ओघवत्या शब्दांत चित्रीत करतात,‘दिव्य फटाके नभी रेखिती सुरेख नक्षी परोपरीमांगल्याचे दीप घेउनी आली दिवाळी घरोघरी’. (पृ. ४४). यात दिवाळीचे प्रकाशमय आणि मंगल वातावरण साकारले आहे. आकाशात उमटणारी रोषणाई आणि घरोघरी येणारा आनंद यांचे चित्रण कवीने नादमय शब्दांत केले आहे. सणांचे वर्णन करताना मुलांना संस्कृतीची ओळख करून देण्याबरोबरच सामूहिक आनंदाची जाणीवही या कविता करून देतात. महाराष्ट्राला संतांची समृद्ध परंपरा लाभली आहे. वारकरी, महानुभाव, नाथ, दत्त, समर्थ आणि शैव अशा विविध संप्रदायांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक जीवनाला समृद्ध केले आहे. या परंपरेतील विचारांचा परिचय बालकांना करून देण्याच्या दृष्टीने ‘संतांची शिकवण’ ही कविता महत्त्वपूर्ण ठरते. कवी लिहितात,‘संतांची ही भूमी आपुली कीर्तनात रे रंगूयाशिकवण त्यांची घेऊनी जगी ज्ञानदीप रे लावूयाज्ञानासंगे रेडा गावेकुत्र्यापाठी नामा धावेवृक्षीवल्ली पक्ष्यांमेळी तुकाराम रे होऊयासंतांची ही भूमी आपुली कीर्तनात रे रंगूया’. (पृ. ३५) या कवितेतून संतपरंपरेतील समता, भक्ती, ज्ञान आणि सर्व सजीवांविषयीची आत्मीयता यांचा प्रत्यय येतो. संत नामदेव, संत तुकाराम आणि संतपरंपरेतील विविध प्रसंगांचा संदर्भ देत कवी मुलांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाशी जोडतात. संतांचे विचार केवळ ऐकण्यापुरते मर्यादित न ठेवता ते आपल्या आचरणात आणावेत, असा संदेश या कवितेतून मिळतो. संतविचारांची ओळख बालवयात करून देण्याचा कवीचा प्रयत्न निश्चितच स्वागतार्ह आहे. आजचे बालविश्व विज्ञान, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावाखाली विकसित होत आहे. नव्या तंत्रज्ञानाशी परिचित असलेल्या बालकांच्या बदलत्या मानसिकतेचे प्रतिबिंब ‘नव्या युगाचे बालक आम्ही’ या कवितेत दिसते. कवी लिहितात,‘नव्या युगाचे बालक आम्हीतंत्रशास्त्र ते पुरे जाणतोगेला आता काळ जुना तोआम्ही काळासवे चालतो’. (पृ. १४) आधुनिक काळातील बालकांचा आत्मविश्वास आणि तंत्रज्ञानाशी असलेली त्यांची जवळीक व्यक्त होते. बदलत्या काळानुसार ज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे, याची जाणीव कवी करून देतात. परंपरेचा आदर राखतानाच विज्ञाननिष्ठ, विवेकशील आणि प्रगतिशील दृष्टिकोन स्वीकारण्याची प्रेरणा या कवितेतून मिळते. आजच्या डिजिटल युगातील बालकांच्या मानसिकतेचे प्रतिबिंब या कवितेत पाहायला मिळते. भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेतकरी आपल्या कष्टातून संपूर्ण समाजाच्या अन्नाची गरज भागवतो, तर जवान देशाच्या सीमांचे रक्षण करतात. या दोन्ही घटकांविषयी कृतज्ञता आणि आदराची भावना निर्माण करण्याचे कार्य ‘जय जवान जय किसान’ आणि ‘शेतकऱ्याचं पोरगं’ या कविता करतात.‘जय जवान जय किसान’ या कवितेत कवी म्हणतात,‘जवान होऊया, किसान होऊयाजय जवान जय किसान मंत्र गाऊया’. (पृ. ५१) अशा शब्दांत देशसेवा, श्रमप्रतिष्ठा आणि राष्ट्रप्रेमाची भावना व्यक्त होते. देशाच्या सुरक्षेसाठी झटणारा जवान आणि समाजाचे पोट भरणारा शेतकरी हे राष्ट्राच्या उभारणीतील महत्त्वाचे घटक आहेत, याची जाणीव बालकांना या कवितेतून होते.‘शेतकऱ्याचं पोरगं’ या कवितेत ग्रामीण जीवनातील कष्ट, संघर्ष आणि आत्मविश्वास यांचे दर्शन घडते. कवी लिहितात, ‘शेतकऱ्याचं कामकऱ्याचं पोरगं मी हाय रंआगीचा गोळा जळती ज्वाला ठिणगीचं एक हाय रं’. (पृ. ६०) या कवितेमधून ग्रामीण भागातील मुलांच्या जिद्दीचे आणि संघर्षशील वृत्तीचे चित्र उभे राहते. शेतकरी कुटुंबातील मुलांचे जीवन केवळ शाळा आणि अभ्यासापुरते मर्यादित नसते; त्यांना शेतीकामाचीही जाणीव असते. कष्टाची प्रतिष्ठा, स्वाभिमान आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याची जिद्द या कवितेतून व्यक्त होते. ग्रामीण बालजीवनाचे वास्तव आणि त्यातील आत्मसन्मान यांचे चित्रण हे या कवितेचे वैशिष्ट्य आहे. बालवयात अभ्यासाबरोबरच खेळ, मनोरंजन आणि शारीरिक हालचाली यांनाही महत्त्व असते. ‘हसा नाचा’ या कवितेतून कवी मुलांना आनंदाने जीवन जगण्याचा, अभ्यास करण्याचा, खेळण्याचा आणि चांगले संस्कार आत्मसात करण्याचा संदेश देतात. ते म्हणतात,‘अभ्यास करूनी खेळा खेळा खेळूनिया अभ्यास कराखेळ आणखी अभ्यासाचे सूत्र चांगले मनी स्मरा’. (पृ. ६२) अशा शब्दांत कवीस अभ्यास आणि खेळ यांचा समतोल साधण्याची प्रेरणा मिळते. अभ्यासामुळे ज्ञानात भर पडते, तर खेळामुळे शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना, शिस्त आणि खिलाडूवृत्ती विकसित होते. क्रिकेटसारख्या सांघिक खेळांतून सहकार्याची भावना आणि परस्परांविषयी आदर निर्माण होतो. मुलांनी अभ्यासाचा ताण न घेता आनंदाने शिकावे आणि खेळातूनही जीवनानुभव मिळवावेत, अशी सकारात्मक जीवनदृष्टी या कवितेतून व्यक्त होते. बालकवितेचे यश तिच्या आशयाबरोबरच भाषेतील सहजता, लय, नाद आणि गेयतेवरही अवलंबून असते. ‘गाऊ मजेत गाणे’ या संग्रहात कवीने बालमनाला सहज समजेल अशी भाषा वापरण्याचा प्रयत्न केला आहे. कवितांतील यमक, लयबद्धता आणि गाण्याच्या स्वरूपातील रचना यांमुळे मुलांना कविता वाचताना, ऐकताना आणि गुणगुणताना आनंद मिळू शकतो. विविध विषयांमुळे बालकांच्या अनुभवविश्वाचा विस्तार होण्यासही मदत होते. ‘गाऊ मजेत गाणे’ हा कवितासंग्रह आनंद, संस्कार, ज्ञान आणि मूल्यशिक्षण यांचा सुरेख संगम घडविण्याचा प्रयत्न करतो. प्रार्थना, भारतीय संस्कृतीतील सण-उत्सव, संतांची शिकवण, विज्ञान-तंत्रज्ञान, देशप्रेम, शेतकरी आणि जवान यांच्याविषयीचा आदर, निसर्ग, ऋतू, प्राणी-पक्षी, संगीत आणि कौटुंबिक नातेसंबंध अशा विविध विषयांतून कवी बालमनाचा वेध घेतात. या संग्रहातील कवितांमध्ये बालकांच्या भावविश्वाशी संवाद साधण्याची क्षमता आहे. ‘गाऊ मजेत गाणे’, ‘गाणे मी गातो’, ‘फुले झाली चांदणे’, ‘ग्रंथ आपले गुरू’, ‘पाणी म्हणजे जीवन’, ‘पाऊसधारा’, ‘जलपरी’, ‘चला जाऊ कोकणात’ अशा काही कविता मुलांना आनंद देतात, काही त्यांच्या मनात मूल्यांची रुजवण करतात, तर काही आधुनिक जगाशी जुळवून घेण्याची प्रेरणा देतात. बालसाहित्याचा प्रमुख उद्देश बालकांना आनंद देतानाच त्यांच्या संवेदनशीलतेचा, कल्पनाशक्तीचा आणि विचारक्षमतेचा विकास घडविणे हा असतो. या दृष्टीने प्रस्तुत बालकविता संग्रह महत्त्वपूर्ण ठरतो. बालकांच्या हातात चांगले साहित्य पडणे ही त्यांच्या वैचारिक आणि भावनिक जडणघडणीसाठी आवश्यक बाब आहे. ‘गाऊ मजेत गाणे’ हा संग्रह अधिकाधिक बालवाचकांपर्यंत पोहोचावा, मुलांनी त्यातील कविता वाचाव्यात, गुणगुणाव्यात आणि त्यातून आनंदासोबत जीवनमूल्यांचीही शिकवण घ्यावी, हीच सदिच्छा!

**• काव्यसंग्रह : गाऊ मजेत गाणे**
**• कवी : बालाजी भागानगरे**
**• प्रकाशक : मिहाना पब्लिकेशन, पुणे**
**• प्रथमावृत्ती : १४ सप्टेंबर २०२६.**
**पृष्ठ संख्या : ६४**
**• किमत: ₹२५० रुपये**

**डॉ नारायण शिवशेट्टे**
**अर्जापूर जि.नांदेड**
**मो.९४२२५५८५७३**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ ऑक्टोबर २०२६


# आमदार सतीश भाऊ चव्हाण यांनी उमरगा तालुक्यासाठी गेल्या १८ वर्षात केलेल्या कामाची माहिती



**आ**मदार सतीश भाऊ चव्हाण यांच्या अठरा वर्षाच्या कारकिर्दीमध्ये त्यांनी मराठवाड्याच्या प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठवाड्यामध्ये आठ जिल्हे ७८ तालुके व दहा हजार गावांमध्ये विस्तृत अशा मतदारसंघ बांधण्याचा काम आमदार सतीश भाऊ चव्हाण यांनी केलेला आहे. मराठवाडा हा दक्षिण भारत उत्तर भारत जोडणारा अथांग असे पसरलेला संतांची भूमी असलेला हा भाग आहे. मराठवाड्याला समृद्ध संस्कृती परंपरा व संघर्षातून उभे राहिलेले समाजजीवन आहे अशा परिस्थितीत एखाद्या लोकप्रतिनिधी केवळ ने रस्ते वीज पाणी आणि इतर मूलभूत सुविधा पुरते स्वतःचे कार्य मर्यादित न ठेवता मराठवाड्यातील विविध भागांसाठी खऱ्या अर्थाने न्याय देण्याचे काम सतीश भाऊंनी केलेले आहे. येणाऱ्या २३ तारखेला होऊ घातलेल्या मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीला सामोरे जाताना कार्यकर्त्यांनी आत्मविश्वासाने त्याला सामोरे गेले पाहिजे. आदरणीय सतीश भाऊ चव्हाण हे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना आपलेसे करून घेणारा, हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारणारे शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक, राजकीय, पाणीप्रश्नांची जाण असणारे, उद्योगधंद्यांचे अभ्यासक, व्यक्तिमत्व आहे. गेल्या १८ वर्षातील भाऊंच्या कार्याचा दखल घेऊन देशाच्या महामयम राष्ट्रपती आदरणीय द्रौपदी जी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे दिला जाणारा 'महाराष्ट्र विधान परिषद उत्कृष्ट संसदपटू' पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आलेला आहे. गेल्या १८ वर्षापासून विधिमंडळात विधिमंडळाच्या बाहेर केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन दैनिक लोकमतने महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित केला आहे.उमरगा तालुक्यासाठी भाऊंनी केलेल्या कामाची यादी येथे थोडक्यात देत आहे १) छत्रपती शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय बलसुर संगणक. २) भारत शिक्षण संस्था संचलित भारत विद्यालय माकणी संगणक. ३) भारत विद्यालय उमरगा संगणक. ४) सखुबाई माध्यमिक आश्रम शाळा बलसूर संगणक. ५) छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा ५ संगणक. ६) शरणप्पा मलंग विद्यालय २ संगणक. ७) लोकमान्य टिळक विद्यालय कदेर संगणक. ८) आदर्श विद्यालय उमरगा ५ संगणक. ९) शरदचंद्रजी पवार स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालय नाईचाकूर ५ संगणक. १०) ज्ञानदीप विद्यालय डाळिंब संगणक. ११) कै.माधवी चालुक्य कन्या विद्यालय उमरगा संगणक. १२) महात्मा गांधी विद्यालय उमरगा संगणक. १३) भारत विद्यालय बेडका संगणक. १४) भारत विद्यालय उमरगा संगणक. १५) जय राम विद्यालय नारायणवाडी संगणक. १६) उच्चमाध्यमिक विद्यालय मागणी संगणक. १७) भारत विद्यालय माकणी संगणक. १८) यशवंतराव चव्हाण विद्यालय पेठ सांगवी संगणक. १९) आदर्श कनिष्ठ महाविद्यालय संगणक. २०) ज्ञानप्रबोधीनी विद्यालय जकेकूर संगणक. २१) कै. भिमराई नाईक माध्यमिक आश्रम शाळा होळी संगणक. २२) राष्ट्रमाता जिजाऊ विद्यालय गुगळ गाव संगणक. २३) लालबहादूर शास्त्री विद्यालय बेलंब संगणक. २४) उर्दू हायस्कूल उमरगा शिवपुर रोड संगणक. २५) ज्ञानेश्वर विद्यालय तुरोरी ड्युअल डेक्स पाच लक्ष रुपये. २६) ज्ञानदीप विद्यालय डाळिंब प्रयोगशाळा साहित्य २५) हजार रुपये. २६) मौजे कसगी येथील ग्रामपंचायत हद्दीत सुलभ सौचालय बांधकाम दोन लक्ष रुपये. २७) मौजे येळी येथील राष्ट्रीय महामार्ग ९ ते भाऊसाहेब बिराजदार विद्यालय कडे जाणार रस्त्याचे काम पाच लाख रुपये. २८) छत्रपती शिवाजी विद्यालय बलसुर ड्युअल डेक्स एक लाख ३१ हजार पाचशे रुपये. २९) भाऊसाहेब बिराजदार विद्यालय येळी ड्युअल डेक्स एक लाख ३१ हजार ५००. ३०) मौजे नाईकचाकुर येथील जिल्हा परिषद हनुमान मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे पाच लाख रुपये. ३१) प्रकाश वाचनालय गुंजोटी फर्निचर २५ हजार रुपये. ३२) लोकमान्य टिळक सार्वजनिक वाचनालय नारंगवाडी फर्निचर २५ हजार रुपये. ३४) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तुरोरी २ संगणक. ३५) श्रीकृष्ण कनिष्ठ विद्यालय गुंजोटी ५ संगणक. ३६) मौजे तुरोरी येथील कालिदास पाटील यांच्या घरापासून ते गुंडू माने यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे काम करणे दहा लाख रुपये. ३७) ग्रामीण प्रशाला माडस ड्युअल डेक्स दोन लाख रुपये. ३८) चौडेश्वरी सार्वजनिक वाचनालय जुनी पेठ २५ हजार रुपये पुस्तके. ३९) शरदचंद्रजी पवार कनिष्ठ महाविद्यालय नाईचाकूर एक लाख रुपये डॉयल डेक्स. ४०) भारत विद्यालय उमरगा ड्युअल डेक्स एक लाख रुपये. ४१) जयराम विद्यालय नारायणवाडी ड्युअल डेक्स एक लाख रुपये. ४२) छत्रपती शिवाजी विद्यालय तळमोड ड्युअल डेक्स एक लाख रुपये. ४३) भारत विद्यालय बेडगा एक लाख रुपये. ४४) शिवशक्ती विद्यालय एकुरगा ड्युअल डेक्स एक लाख रुपये. ४५) जिल्हा परिषद मुलींची शाळा मुरूम प्रोजेक्टर ४१ हजार २५४ रुपये. ४६) भारत विद्यालय उमरगा ड्युएल डेस्क खरेदी एक लाख रुपये. ४७) ज्ञानेश्वर विद्यालय तुरोरी क्रीडा साहित्य २५ हजार रुपये. ४८) जिल्हा परिषद नारंगवाडी एक संगणक. ४९) जिल्हा परिषद वागदरी एक संगणक. ५०) मौजे बेडगा येथे हरिजन वस्ती ते मारुती मंदिरापर्यंत सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे पाच लाख रुपये. ५१) महात्मा गांधी वाचनालय कवठा पुस्तके २०००० रुपये. ५२) आनंद मार्ग सार्वजनिक वाचनालय मातोळा २० लाख रुपये. ५३) मौजे गुंजोटी येथील उमरगा ते गुंजोटी रोड या जोड रस्त्यापासून ते मोहम्मद दामा एज्युकेशन संचलित उर्दू शाळेपर्यंत सिमेंट रस्त्या तयार करणे ३ लक्ष रुपये. ५४) कॅप्टन जोशी स्मारक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय निघून दोन संगणक ५५) श्री जयराम विद्यालय नारंगवाडी एक संगणक ५६) महात्मा गांधी विद्यालय हिप्परगाराव एक संगणक ५७) श्री शिवशक्ती विद्यालय एकुर्गा सोलार संच दोन लक्ष रुपये. ५८) जिजामाता प्राथमिक शाळा उमरगा एक संगणक ५९) जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा तुरोरी एक संगणक ६०) जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा गुगळगाव एक संगणक ६१) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुळज एक संगणक.एवढा विस्तृत स्वरूपात उमरगा तालुक्यासाठी गेल्या १८ वर्षात भरीव असं काम करत असताना. आपण या निवडणुकीला सामोरे जात असताना आपण केलेल्या कामाची पावती म्हणून मतदारांनी भरभरून मतदान करावं ही नम्र विनंती. आमदार सतीश भाऊ चव्हाण यांचे नाव मतपत्रिकेमध्ये अनु क्रमांक दोन ला आहे त्यांच्या नावासमोर निवडणूक आयोगाने दिलेल्या पेन ने १ हा क्रमांक लिहून त्यांना भरघोस मताने विजयी करावी ही नम्र विनंती.


**डॉ. रमेश शिंदे.**
छत्रपती संभाजीनगर.
९४२३०१८६६०.


# तथागत बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना अभिवादन; धम्मभूमीत रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** अशोक विजयादशमी तथा ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरातील धम्मभूमी, बुद्धलेणी येथे आयोजित रक्तदान व मोफत आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन व्हेन. विशुद्धानंद बोधी फाउंडेशनचे भदंत संघप्रिय थेरो व भिक्खूसंघाच्या हस्ते करण्यात आले. व्हेन. विशुद्धानंद बोधी फाउंडेशन व प्रज्ञा प्रसार धम्म संस्कार केंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिराला भदंत नागसेनबोधी थेरो, भदंत संघप्रिय थेरो (औरंगाबाद), भदंत आर. आनंद थेरो (कोल्हापूर), भदंत शिलबोधी थेरो (मुंबई), भदंत धम्मबोधी व भदंत निर्वाण यांचे मार्गदर्शन लाभले. बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दिक्षा घेतली. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा केला जातो. तथागत बुद्धांच्या प्रज्ञा, करुणा, शांती व समतेच्या विचारांचा प्रसार करण्यासोबतच गरजू नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले. महामाया आधार सेवाभावी संस्था, रिधीमाँ फाउंडेशन आणि विनर्स एज्युकेशन अँड सोशल वेल्फेअर मल्टिपर्पज सोसायटी औरंगाबाद यांच्या वतीने आयोजित या उपक्रमात नागरिकांना आरोग्य तपासणीची सुविधा देण्यात आली आणि रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. या शिबिराच्या आयोजनासाठी राजकुमार कांबळे, अमरदिप हिवराळे, प्रा. गुणरत्न सोनवणे, अक्रम खान, प्रभू राऊत, सामाजिक कार्यकर्ते अमोल घुगे, तेजल कांबळे, सिद्धार्थ मोरे, ज्योतिसिंग हजारी, राहुल वाहूळ आणि क्षितिज हजारी यांनी पुढाकार घेतला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ ऑक्टोबर २०२६


# खर्ची पडलीत काही स्वप्नं:-स्त्री स्वअस्तित्वाचा अस्वस्थ हुंकार




**क**वयित्री सविता लोंढे यांचा अतिशय आशय संपन्न सृजन समर्पक कवितासंग्रह 'खर्ची पडली काही स्वप्नं म्हणजे स्त्री आयुष्याची अनेक स्वप्न पाहते कारणं तिच्या कडे मातृत्व आहे.ती सदोदित मनमोहक स्वप्न पाहते.पण या पुरुषी व्यवस्थेनं तिच्या हळूवार संवेदनेचा चुरडा केला आहे.पुढे या स्वप्नांची राखरांगोळी होतं जाते तिच्या मनासारखे तिला नाहीच मनमुक्त जगता येतं.या जगण्याच्या कुरघोडीत ती मनाच्या तडजोडी करीत मनमारून जगत असते.कारण तिचं आयुष्य व जगणं या पुरुषी व्यवस्थेनं पायाच्या जखमाळलेल्या कुरुपाची ती ठणक सहन करीत जगत असते.चेहऱ्यावर उसणे हसू घेऊन ती जगत असते.तिच्या खरतड जखमाळलेल्या जगण्याचे गोंदण अमिट होत गेले आहेच.म्हणून ती म्हणते स्वप्न खर्ची झालेआहे.मग काव्य अक्षरं तिच्या मायाळू ओटीत येते.फक्त तिचे मागणे जसे"आता फक्त एवढंच मागणं-/तिनं मला तिच्या पदरात घ्यावं./आणि या नात्याला घालावं तिनं/शब्दरुपी मायेचं पांघरूण "(पृ.१४) कविता ही धारधार निर्धाराची ध्येयासक्ती एक सृजनशील ओळख होऊन येते.रडायचे असेल तर रिदम आणि रूदण केलं तर तो टाहोकाळजाला पाझर फोडतो ती खरी कविता असते.अस्वस्थ समकालात ही कविता संयत मनोभूमिकेतून शब्दांची अस्सल सल घेऊन आली आहे.इथला स्त्रीधर्म ती पाळतेतिच्या नावाने तिची व्यथांग वेदना ती मुखर करते.या कवितेचा आत्मा हा मायेच माहेर आहे.आई नाही माहेराहून वाटे लावताना बापाची घालमेल आणि मायेचा पदर नाही बापाचा मायाळू आदर व आधार आहे.कवयित्री बापाच्या गळ्यात पडून रडते ती ओंजळभर जन्माची शिदोरी कवितेची होऊन जाते.हे मनोगत म्हणजे आत्मिक सृजनशील सृजनांचे भावानुबंध या कवितेचा मर्मग्राही आत्मानुबंध आहे.मग ती स्वत्वाचा स्वर शोधून ही मनस्वी हृदयांकित मुक्त व्यक्त होतं जाते.बाईचे स्वप्न हे खर्चीच होते पण गांधारी होऊ नकोस बाई"अंधारातून निघ आता बाहेर/डोळ्यांवर पट्टी बांधून काही होणार नाही/तुझ्या हाताची पकड मजबूत कर/कारण आता/गांधारी होण्याची वेळ नाही/आणि हो-/हे महाभारत नाही/संविधान भारत आहे"(पृ.१८)ही समकालीन स्त्रीयांची सजग भान जागृत करून देणारी कविता ही नितळ शितळ सवितेसारखी वाहते.मैत्री,ही तंत्रज्ञान युगाची काावळ्यांची टकटक, इन्स्टाग्राम, टेलिग्राम, फेसबुक, व्हाट्सअप या स्थळाहुन भावभावनेचा उद्विग्न उद्रेक आज होतो आहे.कशासाठी,आभाळ कवेत घेयच आहे, वणवा,या कवितेचा मर्मग्राही अनुबंध अप्रतिम आहे तर अमानुष ही वासनांध विकृतीचा कळस गाठणारी सैतानी विकृतीचा मनस्वी खेद या कवितेतून येतो.कन्येच दान करणारा तो बाप खरा श्रीमंत तो खरा पुण्यवंत.लेक बाप व्यक्त करते"बापाचे कष्ट आणि आईची उपासमार/जेवताना तिला भूकच नसायची/पाणी पिऊन ती गपगार पडायची/तेंव्हा कळत नव्हतं माय असं का करायची/आता आई झाले तेव्हा सगळंच आपसूक कळत गेलं सगळं"(पृ.२६)रंगले मी, माणसं, मागणं,निजखूण, कविता,खूण,साद, ओळख,या कविते स्त्रीत्वाची मनस्वी तळ ढवळून आपल्या स्वप्नातील स्व चां शोध घेत एक अनामिक ओढीनं तनामनावर काटा उठतो.तसेच तू, स्वप्न,ऋतू ही हळूवार मनला स्पर्श करून जाणारी स्वअस्तित्वाची जाणीव करून देते ती अशी "ऋतू सातवा मनात सलतो/दिले तयाने अवघे स्त्रीपण/या वळणावर कसे सावरू/ढळते आहे माझे मीपण"(पृ.३८)या कवितेने एक सृजनशील भावा मानाचे हळवे पदर उलगडून दाखविले आहे.कहाणी,वाचन लेखन श्रवण अनुबंध असल्याने ही आपल्याचं भावविश्वाची अनुभूती आहे.मग हा चकवा मनाला भूरळ घालतो व एक अमोघ सृजन भाव अस्वस्थ करून जातो.तसा 'आरसा'हे अलवार क्षण पकडणारी कविता.दु:ख ही साक्षेपी निर्धार शब्दांगार देऊन जाणारी कविता "आता त्या/कृष्णाची वाट पाहत नाहीत/स्वत:च लिहीत आहेत/आपल्या वेदनेची नवी कथा/नवा इतिहास "(पृ.४३)मानसातला माणूस शोधायला हवा..नाती हरवत चालली ही सखेद वेदनेचा 'शोध'ही कविता देते.'माहेरची तुळस आणि आधारवड याकविता मातृहृदयातून अंगाई होऊन आल्या आहेत.बाप वड होऊन आभाळ सावली देतो तर आई तुळस घराची शोभा आहे.मग कवयित्री आजी होते नात्याने तेंव्हा ती ओंजळभर मायेचा ओलावा देते आपल्या नातवंडांना. हीगहिवरल्या मनाचा आनंदाचे डोही आनंद देते.८मार्च,तशा 'चारचौघी,डायरी,बाई, स्त्री,उर्मिला,या कवितेची सजगता अत्यंत चिंतन चिकित्सक आशयाने आली.यात समकालीन वास्तवाचे सम्यक भान आहे.सीता,सावित्री, उर्मिला,तिला आता नकोय.म्हणून "बाई जाईचा सुंगध,बाई वादळी हुंकार,/अन्यायाच्या अंधाराला,बाई होते ग अंगार../बाई चालते ही वाट,बाई काट्यांचा हा माळ/तिची पाऊले मांडती, नव्या उमेदीचा खेळ"(पृ.५०)सविता लोंढे यांचे सृजन समर्पक विवेक साधना ही कविता देऊन जाते.विठ्ठला, प्रवास,आईपण,पूल, देहाच्या झुलत्या पूलावरुन सर्व आशा आकांक्षा पूर्ण अपूर्णत्वाकडे स्त्री मनाच्या खोल कप्प्यात जतन करते.तसा हा आईपणाचा प्रवास ही एक निर्मिक शक्तीचा अनुबंध आहे.पुढे खर्ची पडलीत स्वप्न,घर,गर्भवती,तुझा जन्म,आस कुंपण हे सारं अनुभवाताना शेवटी स्त्रीलाचं कुंपणात अडकवून तिच्या भावनिक शारीरिक मानसिक छळ केल्या जातो.ही कविता संयत मनोभूमिकेतून विद्रोही भाष्य करते "मी कधीच?/कुठेच?/कशीही/आणि कुणाजवळही नाही व्यक्त होऊ शकत/तुला खरं सांगू/ कुंपण तयार झालंय माझ्याभोवती "(पृ.६५) हासमकाल अत्यंत भंयकर अनैतिक कृत्याचा आहे.ही कविता अतिशय सजग भान देऊन जाते.हे मन मुक्त करण्यासाठी ज्याची त्याची कविता.भूक,निसटणारे क्षण, ब्रेनडेड दिवस,मादी,गुलाबी व्हावस वाटतंय,स्टॅंप, शोध,प्रेतवत,झाड,अर्थ या कवितेने एक सृजनशील त्रयस्थ दृष्टीचा कोन दिला आहे.एक स्त्री म्हणून या कवितेकडे पहा तिच्या स्व अस्तित्वाचा तिनेच घेतलेला एक सृजनशील शोध.स्टॅंप,शिक्का,मोर्तब ठसा हक्क आहे.म्हणून या स्त्रीत्वाचा वापर केला आहे.तिच्या भाव भावनेचा आदर या पुरूषी व्यवस्थेने केलाच नाही.म्हणूनही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल वर्तमानची ठणक मांडते.ख्यातनाम समीक्षक डॉ रवींद्र शोभणे यांची कविता विषयक अतिशय चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक विवेचन प्रस्तावनेत आहे.कवयित्री सविता लोंढे जी आपल्या स्नेहाळू मनोगत व्यक्त करताना कवयित्री आशा डांगे यांच्या काव्यसंग्रह आग्रहाची ऋणाई व्यक्त करते.तर"स्त्रीच्या जगण्याच्या मुळाशी एक पुरुष असतो.तो बाप, भाऊ,पती, मित्र प्रियकर, मुलगा अशा नात्यात विभागला जातो.आणि या सगळ्या नात्यांतून तिच्या जीवनाला तो संपुर्ण आकार देत जातो.तिचं जगणं अर्थपूर्ण करीत जातो हीच या कवितेच्या मुळाशी असलेली आस आहे.आशयाप्रमाणेच रचनेच्या दृष्टीनेही ही कविता वैविध्य जपणारी अशी आहे.मुक्तछंद,अष्टाक्षरी,गजलसदृश्य,गीत सदृश्य अशा विविध रूपांतून ती व्यक्त होत जाते.कवितेचा आशय पाहून ती आपला रूपबंध स्वीकारत नाहीत.कवितेच्या आशयाची आणि रूपबंधाची त्यांना सखोल जाण आहे, तिनं आपलं अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न केला आहे.हे या कवितेच्या दृष्टीने मला अधिक महत्त्वाचे वाटते"(ब्लर्ब) डॉ रवींद्र शोभणे यांची पाठराखण अतिशय चिंतन चिकित्सक आशय संपन्न सृजन समर्पक हे या कवितेचं वैभव आहे.मेहंदी माखलेले,स्त्रीची नाचूक पाऊले.पुढे हिच लक्ष्मीची पाऊले.कुंकवाच्या ताटातून गृहप्रवेश करते.हिच नाजूक पाऊले जखमाळून जाते.ख्यातनाम चित्रकार संतुक गोळेगावकर यांचे मुखपृष्ठ आशय संपन्न झाले आहे.कवयित्री सविता लोंढे यांच्याकवितालेखनास हार्दिक शुभेच्छा.



**पुस्तक:-खर्ची पडलीत काही स्वप्नं (कवितासंग्रह)**
**कवयित्री:-सविता लोंढे , संभाजीनगर**
**प्रकाशक:-अविशा प्रकाशन,नागपूर**
**प्रथमवृती:-६ मे २०२६**
**मुखपृष्ठ:-संतूक गोळेगावकर**
**किंमत:-१५०रूपये**
**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके,जालना**

# रब्बी ज्वारी व गहू उत्पादक शेतकऱ्यांना एकात्मिक अन्नद्रव्य आणि कीड व्यवस्थापन अनुदानासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**बीड (भगवंत पाळवदे) :** राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान (अन्नधान्य पिके योजना) अंतर्गत सन २०२६-२७ च्या रब्बी हंगामात रब्बी ज्वारी आणि गहू पिकांची पेरणी केलेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाने महत्त्वाची घोषणा केली आहे. या पिकांमध्ये एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन (INM) व एकात्मिक कीड व्यवस्थापन (IPM) बाबींचा वापर करणाऱ्या वैयक्तिक शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सुभाष साळवे यांनी केले आहे. योजनेचे स्वरूप शेतकऱ्यांनी खुल्या बाजारातून खरेदी केलेल्या शिफारसीत निविष्ठांच्या खरेदी रकमेच्या ५०% किंवा कमाल रुपये २,५००/- प्रति हेक्टरी (यापैकी जे कमी असेल ते) अनुदान दिले जाईल. प्रत्येक शेतकरी एका हंगामात जास्तीत जास्त ०२ हेक्टर मर्यादेत अनुदानासाठी पात्र राहील. अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या आधार-संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यात थेट जमा (DBT) केली जाईल. पात्रतेचे निकष:अर्जदार वैयक्तिक शेतकरी असावा. रब्बी हंगामात ज्वारी किंवा गहू पिकाची पेरणी केलेली असावी. कृषी विद्यापीठाने सदर पिकांसाठी शिफारस केलेली औषधे किंवा अन्नद्रव्ये खरेदी केलेली असावीत. शेतकऱ्याचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे अनिवार्य आहे. आवश्यक कागदपत्रे :अधिकृत निविष्ठा खरेदी बिल, स्वत:च्या नावाचा अद्ययावत ७/१२ उतारा राष्ट्रीयकृत बँक पासबुकची छायांकित प्रत इ.इच्छुक शेतकऱ्यांनी खालील कागदपत्रांसह संबंधित कृषी सहाय्यक यांच्यामार्फत तालुका कृषी कार्यालयाकडे अर्ज सादर करावा: तसेच योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व अटी व शर्ती अर्जदार शेतकऱ्यांवर बंधनकारक राहतील. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ ऑक्टोबर २०२६


## जिंतूर ते भोगाव देवी पायी दिंडीची परंपरा १९ वर्षांपासून अखंड सुरू!



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर :** नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक परंपरा जपत भक्तीचा जागर करणारी जिंतूर ते श्री क्षेत्र भोगाव देवी ही पायी दिंडी गेल्या १९ वर्षांपासून अखंड सुरू आहे. श्री संत गजानन माऊली मित्र मंडळ, जिंतूर यांच्या वतीने दरवर्षी नवरात्रोत्सवात आयोजित करण्यात येणाऱ्या या दिंडीत यंदाही भाविक उत्साहाने सहभागी झाले आहेत.या दिंडीची सुरुवात १९ वर्षांपूर्वी विजय देशमुख यांच्या घरा पासून व मार्गदर्शनाखाली अवघ्या पाच जणांनी केली होती. श्रद्धा, भक्ती आणि सामूहिक सहभागाच्या बळावर या उपक्रमाचा विस्तार होत गेला असून, आज या दिंडीत सुमारे 100 ते 150 भाविक सहभागी होतात. ही वाढती संख्या मंडळाच्या धार्मिक कार्याला मिळणारा प्रतिसाद अधोरेखित करते.जिंतूर ते भोगाव देवी हे सुमारे १३ किलोमीटरचे अंतर भाविक पायी पार करतात. दिंडी दरम्यान देवीची विविध भक्तिगीते, हनुमान चालिसा, भजन आणि नामस्मरण केले जाते. डफली, टाळ आणि मृदंगाच्या तालावर फुगडी खेळत भाविक भक्तिरसात तल्लीन होतात. भक्तिमय वातावरणात मार्गक्रमण करणारी ही दिंडी नवरात्रोत्सवातील श्रद्धा आणि परंपरेचे दर्शन घडवते. दसऱ्याला महाभंडारा अन् स्वच्छता अभियाननवरात्रोत्सवाची सांगता दसऱ्याच्या दिवशी भोगाव देवी मंदिरात महाभंडाऱ्याचे आयोजन करून केली जाते. यासोबतच मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवून सामाजिक बांधिलकीही जपली जाते.

या वेळी जिंतूर शहरातील देवीभक्त सचिन रायपत्रीवार, पप्पू घुगे, जी एस घुगे,अभिजित देशमुख, अनिल पतंगे, दिलीप देवकर, गणुमामा, शंकर मेहता, घंदारे सर, संतोष आंधळे, सी एस, भालेराव आप्पा, प्रदीप अकोसे, शिवाजी दराडे, शिवाजी टेकुलवार, वटाणे सर, प्रशांत सर, साई प्रसाद वट्टमवार, आदी मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहतात.१९ वर्षांपूर्वी पाच जणांनी लावलेले भक्तीचे रोपटे आज 100 ते 150 भाविकांच्या सहभागातून बहरले असून, जिंतूर ते भोगाव देवी दिंडीची ही परंपरा धार्मिक श्रद्धा, एकजूट आणि सेवाभावाचा आदर्श ठरत आहे.

## अंजना स्कूल ऑफ एक्सलन्सच्या दोन खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड!





**दौलताबाद (जावेद अहमद) :** परभणी येथील विभागीय क्रीडा स्पर्धेत वेदांत जगदाळे व पृथ्वीराज राजपूत यांची सुवर्ण कामगिरीपरभणी येथे पार पडलेल्या विभागीय क्रीडा स्पर्धेत अंजना स्कूल ऑफ एक्सलन्सच्या दोन विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. 19 वर्षांखालील वयोगटात वेदांत ज्ञानेश्वर जगदाळे याने हातोडाफेक स्पर्धेत, तर पृथ्वीराज राजपूत याने भालाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. या दोन्ही खेळाडूंची राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष शंकर पल्हाळ,अध्यक्षा स्मिता पल्हाळ,उपाध्यक्षा मोनिका पल्हाळ,सचिव स्वर्णजित पल्हाळ, प्राचार्या स्नेहा पवार,व्यवस्थापक देव साठे,क्रीडा शिक्षक आकाश इंगळे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले असून आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## पंडित नेहरू महाविद्यालयाच्या अवधूत कदमला ला राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत रौप्य पदक




**छत्रपती संभाजीनगर :** दिनांक १४ ऑक्टोबर ते १९ ऑक्टोबर २०२६ चंद्रपूर जिल्हा बॅडमिंटन डेव्हलपमेंट असोसिएशन आणि महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने योनेक्स-सनराईज स्व. डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार स्मृती महाराष्ट्र ज्युनिअर (U-१९) आंतरजिल्हा व राज्य बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन बॅडमिंटन हॉल, जिल्हा क्रीडा संकुल सिव्हिल लाईन्स, चंद्रपूर, येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयाचा खेळाडू अवधूत गोविंद कदम (१२ वी विज्ञान) ने उत्कृष्ट कामगिरी करत रोप्य पदक प्राप्त केले आहे. या अगोदरच्या राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत देखील अवधूतने उत्कृष्ट कामगिरी केली होती. या सातत्यपूर्व कामगिरीमुळे अवधूतची राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.

अवधूत कदमचे अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री रंगनाथ काळे, सचिव श्री. प्रकाश काळे संचालक मंडळ प्रा. प्राचार्य पंडित नलावडे महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनचे कार्याध्यक्ष शिरीष बोराळकर, महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव श्री सिद्धार्थ पाटील, डॉ. दिगंबर गंगावणे, डॉ.किरण इंगळे डॉ .एम आर खान यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत .


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)

विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ ऑक्टोबर २०२६


## काव्यांगण साहित्य मंचातर्फे उमरग्यात दुसरे राज्यस्तरीय कविसंमेलन

**उमरगा : (प्रा. नागसेन कांबळे)** येथील काव्यांगण साहित्य समूहाच्या वतीने राज्यपातळीवरचे दुसऱ्या काव्यांगण दीपोत्सव कविसंमेलनाचे दिमाखदार आयोजन येत्या 25 ऑक्टोबर रोजी पोतदार इंग्लिश स्कूलच्या भव्य सभागृहात करण्यात आले आहे. यात महाराष्ट्रभरातून अनेक साहित्यिक कवी सहभागी होणार आहेत.या राज्यपातळीवरच्या कविसंमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिध्द साहित्यिक तथा व्याख्याते अहिल्यानगरचे मा.सुभाष सोनवणे ,उद्‌घाटक उमरगा लोहारा विधानसभेचे आमदार मा. प्रवीण स्वामी ,स्वागताध्यक्ष पोतदार इंग्लिश स्कूलचे प्राचार्य मा.बि.पी.सिंग, प्रमुख पाहुणे समाज विकास संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते आणि साहित्यिक विचारवंत मा.भूमिपुत्र वाघ, मा. डॉ. संजय राठोड, कवयित्री,गीतकार मा. सुवर्णा पवार, इचलकरंजी हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.गेल्या अनेक वर्षापासून काव्यांगण साहित्य मंचाचे संस्थापक अध्यक्ष मा. विकास राठोड यांनी उमरगा आणि पंचक्रोशीत साहित्यिक चळवळ अत्यंत तळमळीने आणि मोठ्या उत्साहाने सुरुवात केली आहे.साहित्य हा समाजाचा आरसा आहे, समाजाचे वास्तव हे साहित्यातून प्रतिबिंबित होत असते. कविता म्हणजे मानवी मनाचा भावनात्मक असा अविष्कार असतो. कवीची कल्पनाशक्ती प्रतिभा आणि भावनात्मक अविष्कार यातून समाजातले, निसर्गातले आणि आपल्या मनातले उत्स्फूर्त वास्तव कविता या साहित्य प्रकारातून चित्रित होत असते. कवीने पाहिलेले ,अनुभवलेले समकालीन सामाजिक जीवन निसर्ग सौंदर्य, मानवी वृत्ती प्रवृत्ती ,मानवी व्यथा, वेदना संघर्ष आणि जीवन जाणिवांची ओळख, शब्दरूपाने कवी काव्य स्वरूपात मांडत असतो. आपल्या हळुवार भावनांना मुखर करण्यासाठी , व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी विकास राठोड हे नेहमीच अव्यहातपणे धडपडत असतात. कवींसाठी प्रवर्तन मंच मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत असतात . समाजातले आजूबाजूचे वास्तवानुभव इतरांना कळावेत , नवतरुण लेखनाला उत्तेजना मिळावी, समकालीन जाणीवांचा वेध आणि बोध घेता यावा ,या उदात्त हेतूने काव्यांगण साहित्य मंच यातर्फे यावर्षीही 25ऑक्टोबरला भव्य असे दुसरे राज्यस्तरीय कवी संमेलन घेण्याचे योजिले आहे ,असे अध्यक्ष विकास राठोड यांनी बोलताना आम्हाला सांगितले. या कविसंमेलनात वाशीम, लातूर, परभणी, उदगीर, पुणे, मुंबई, सोलापूर, अहिल्यानगर, निलंगा , अक्कलकोट, ठाणे, धाराशिव, बार्शी, पंढरपूर, डोंबिवली, मुरूम आणि उमरगा येथील नामांकित आणि नवोदित कवी सहभागी होणार आहेत. त्यात राजेंद्र महल्ले, गौतम कोकरे, रशीद शादौ, रविराज राठोड, वैशाली गायकवाड, चंदा कौसाडीकर, सुमन पवार, चंद्रकांत गुंडरे, पंढरी बनसोडे, आरती महेकर, दत्तात्रय इंगळे, बुध्दकन्या भालेराव, सुनील राठोड, रज्जाक शेख, आनंदा साळवे, लक्ष्मी बिरादार, निशा जमादार, सुजित पाटील, शगुफ्ता इनामदार, किशोर पांचाळ, मदन जवळगेकर, विजयकुमार सोनवणे, दस्तगीर जमादार, संस्कृती कांबळे, श्रुती चौधरी, मुक्तेश्वर मुळे, वर्षराणी मुस्कटवाड, अर्चना मठपती, जमलोद्दीन शेख, मिलिंद आहेर, जावेद शेख, श्रद्धा मगर, सुभाष चव्हाण , सागर गुरव , प्रकाश महामुनी, जयश्री जगताप, अमेय मुळे, किशोद देवतळे, कौसवी लोंढे, काकासाहेब कांबळे, गिरीश तुळजापुरे, सई शिंदे, स्वप्नील कांबळे, युवराज बिराजदार, कांचन कांबळे, अशोक चव्हाण, प्रमोद बनसोडे, भावना गांधीले, विजय सागर आणि सय्यद कासीम असे महाराष्ट्रातील सर्वदूर परिसरातून कवी ,कवयत्री सहभागी होणार आहेत. सर्व सहभागी कवींना काव्यांगण साहित्य समूहातर्फे प्रोत्साहन देण्यासाठी सन्मानचिन्ह आणि गौरवपत्र देऊन आदरातिथ्य करण्यात येणार असून त्याचबरोबर साहित्याच्या ,समाजाच्या आणि शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या साहित्य कलावंत यांना त्यांच्या कार्याची गती द्विगुणित करण्यासाठी काव्यांगण साहित्य मंचातर्फे विविध पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. त्यात काव्यदीप पुरस्कार 2026डॉ.स्वाती खंदारे, पुणे यांना जाहीर झाला असून ॲड. दिलीप कांबळे, धाराशिव(आदर्श समाजसेवक पुरस्कार..२०२६),सुभाष चव्हाण, धाराशिव(आदर्श शिक्षक पुरस्कार..२०२६),मंगल बोराडे, तुळजापूर(उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार २०२६),सुदर्शन जोशी, धाराशिव, (उत्कृष्ट निवेदक पुरस्कार..२०२६)गौतम अंबादास बाकले, धाराशिव,(आदर्श समाजसेवक पुरस्कार २०२६),भावना गांधीले, अहिल्यानगर,(आदर्श शिक्षिका पुरस्कार२०२६),वर्षा ननवरे, इंदापूर,(काव्यदीप पुरस्कार २०२६),अमेय मुळे, डोंबिवली(उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार २०२६),शमशाद जावेद पटेल, सोलापूर(आदर्श शिक्षिका पुरस्कार २०२६),रंजिता पवार, उमरगा (आदर्श समाजसेविका पुरस्कार २०२६),भाग्यश्री देवकते (बाचके )उमरगा (उत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार २०२६),प्रा. निशा घोसले जमादार, लातूर (हिरकणी पुरस्कार २०२६),मा.अनुराधा मारचट्टीवार, हैद्राबाद (रणरागिणी पुरस्कार २०२६) असे एकूण बारा पुरस्कार देण्याचे काव्यांगण समूहाचे अध्यक्ष विकास राठोड, उपाध्यक्ष अयान मौजन, सचिव वृंदा गंभीर, सहसचिव स्नेहा जाधव आणि कोषाध्यक्ष सिद्धीविनायक शिंदे यांनी जाहीर केले आहे.

या कविसंमेलनाचा आणि आनंदसोहळ्याचा जास्तीत जास्त रसिक व काव्यप्रेमिनी आस्वाद घ्यावा असे आवाहनही काव्यगण साहित्य मंचाच्या वतीने करण्यात आले आहे.

## जिंतूरात धम्मचक्र प्रवर्तन दीन उत्साहात साजरा



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** शहरात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर 70 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन व अशोका विजया दशमी निमित्त बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमानिमित्त सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास हार घालून अभिवादन करण्यात आले त्यानंतर पंचरंगी व निळ्या दुधाचे ध्वजारोहण पू.भंते संघरत्न यांच्या हस्ते करण्यात आले.पू.भंते संघरत्न यांनी उपस्थित बुद्ध उपासक उपासिकांना बुद्ध वंदना पंचशील त्रिशरण व धम्मदेशना दिली. या धम्मचक्र परिवर्तन दिन पी. एस. सावंत,संभाजी खिल्लारे व प्रधान सर यांनी उपस्थितीना धम्मचक्र परिवर्तन दिनाच्या शुभेच्छा देत धम्मचक्र दिनाचे महत्त्व सांगून त्यावर आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गुणीरत्न वाकोडे, नगरसेवक अशोक बंड, माजी नगरसेवक चंद्रकांत बहिरट, बंटी निकाळजे, ॲड.बाबासाहेब घनसावध, लखन खिल्लारे प्रकाश, नवसागर, विकास अण्णा मोरे,अशोक वाकळे, जयश्री देबाजे आशाताई खिल्लारे सह बहुसंख उपासिका महिलांची उपस्थिती होती.

## बुडीत जमिनीतून उगवणार हिरवा चारा; बीड जिल्ह्यात दुष्काळावर मात करण्यासाठी नाविन्यपूर्ण प्रयोग




**बीड भगवंत पाळवदे) :** जिल्ह्यातील तीव्र दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चारा टंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाने नाविन्यपूर्ण उपाययोजना हाती घेतली आहे. जलाशय, तलाव आणि धरणांमधील पाणीसाठा कमी झाल्याने उघड्यावर आलेल्या बुडीत क्षेत्रातील सुपीक गाळपेरा जमिनीवर चारा पिकांची लागवड करण्याबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष आढावा बैठक पार पडली.जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत पशुधनासाठी हिरव्या चाऱ्याची उपलब्धता वाढविण्यावर भर देण्यात आला. उपलब्ध जलस्रोतांच्या बुडीत क्षेत्रातील सुपीक जमिनीचा योग्य वापर करून चारा टंचाईची तीव्रता कमी करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील उपलब्ध गाळपेरा क्षेत्राची माहिती संकलित करून त्या ठिकाणी चारा पिकांची लागवड करता येईल का याची शक्यता तपासली जाणार आहे. यासाठी योग्य चारा पिकांची निवड आणि संबंधित सर्व विभागांमध्ये समन्वय साधून प्रभावी अंमलबजावणी करण्याचे नियोजन बैठकीत करण्यात आले.

या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, अधीक्षक अभियंता पल्लवी जगताप, नखाते, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे आणि जिल्हा उपयुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय डॉ. कदम यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ ऑक्टोबर २०२६

## दुष्काळी परिस्थितीत एकही बालक व माता पोषण आहारापासून वंचित राहू नये; जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे निर्देश

**बीड (भगवंत पाळवदे) :** जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर लहान बालके, गरोदर महिला आणि स्तनदा मातांचे आरोग्य अबाधित राहावे, यासाठी प्रशासनाने सतर्क राहावे. जिल्ह्यातील एकही पात्र लाभार्थी पूरक पोषण आहारापासून वंचित राहू नये, याबाबत विशेष दक्षता घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज दिले. जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास विभागाच्या जिल्हास्तरीय पोषण आहार संनियंत्रण समितीची आढावा बैठक आज जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, त्यावेळी ते बोलत होते.खरीप हंगामातील पावसाची तूट व प्रतिकूल परिस्थितीमुळे शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने, ग्रामीण व टंचाईग्रस्त भागातील संवेदनशील घटकांवर कोणताही विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजना (ICDS) प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील पोषण आहार पुरवठा, अन्नधान्य साठा, पिण्याचे पाणी आणि इंधनाच्या उपलब्धतेचा सविस्तर आढावा घेतला.जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रांमार्फत सध्या ३ ते ६ वर्षे वयोगटातील ५९ हजारांहून अधिक बालकांना गरम ताजा आहार (HCM) दिला जात आहे. तसेच, ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके, तीव्र कमी वजनाची बालके आणि गरोदर व स्तनदा माता अशा एकूण सुमारे ८१ हजार लाभार्थ्यांना घरपोच पोषण आहार (THR) पुरविला जात असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. ग्रामीण भागासह बीड पूर्व व पश्चिम या नागरी प्रकल्पांमधील अंगणवाड्यांमध्येही महिला बचत गट व सेविकांमार्फत नियमितपणे सकाळचा नाश्ता व दुपारचा पौष्टिक आहार दिला जात आहे.सद्यस्थितीत जिल्ह्यात ऑक्टोबर व नोव्हेंबर महिन्याचा अन्नधान्य व पोषण आहाराचा पुरवठा पूर्ण झाला असून, पुढील महिन्यांची मागणीही नोंदवण्यात आली आहे. सध्या कोणत्याही अंगणवाडी केंद्रात किंवा बचत गटांना अन्नधान्य, पाणी अथवा इंधनाचा तुटवडा नसल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी यावेळी स्पष्ट केले.

आगामी काळात टंचाईची तीव्रता वाढल्यास कोणत्याही परिस्थितीत आहार पुरवठा खंडित होऊ नये, यासाठी महिला व बालविकास, आरोग्य, पाणी पुरवठा आणि महसूल विभागाने परस्पर समन्वयाने काम करावे. अंगणवाड्यांमधील आहाराचा दर्जा, बालकांची नियमित आरोग्य तपासणी आणि लसीकरण यावर भर देऊन कुपोषण रोखण्यासाठी तातडीच्या उपाययोजना राबवाव्यात, असेही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी यावेळी निर्देशित केले. बैठकीला महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## रब्बी ज्वारीच्या प्रमाणित बियाण्यांसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन

**बीड (भगवंत पाळवदे) :** रब्बी हंगाम सन २०२६-२७ अंतर्गत 'राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण उप अभियान- पौष्टिक तृणधान्य (NFSNM)' योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रब्बी ज्वारी पिकाचे प्रमाणित बियाणे ५० टक्के अनुदानावर वितरित केले जाणार आहे. याशिवाय शेतकरी गटांसाठी १०० टक्के अनुदानावर पीक प्रात्यक्षिके घटक राबविण्यात येणार असून, या दोन्ही घटकांचे लक्षांक महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र शेतकरी व शेतकरी गटांनी याचा लाभ घेण्यासाठी लवकरात लवकर अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी एस. एम. साळवे यांनी केले आहे. अनुदानाचे स्वरूप प्रमाणित बियाणे वितरण (वैयक्तिक शेतकरी): १० वर्षा आतील वाणांसाठी रु. ३०/- प्रति किलो व १० वर्षावरील वाणांसाठी रु. १५/- प्रति किलो प्रमाणे अनुदान दिले जाईल. पीक प्रात्यक्षिके (शेतकरी गट): बियाणे घटकाचा लाभ शेतकरी गटांना १०० टक्के अनुदानावर दिला जाईल.

याशिवाय एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, एकात्मिक कीड व्यवस्थापन आणि शेतकरी प्रशिक्षणही राबविण्यात येणार असून, यासाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. इच्छुक व पात्र शेतकऱ्यांनी महाडीबीटीच्या mahadbt.maharashtra.gov.in (किंवा थेट शेतकरी लॉगिन www.mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin) या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज करावा.

योजनेबाबत अधिक माहितीसाठी कृषी विभागाचे संकेतस्थळ www.krishi.maharashtra.gov.in तसेच संबंधित कृषी सहाय्यक, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही कृषी विभागा मार्फत कळविण्यात आले आहे.

